**MHAU080013832025**

**<u>कि.फौ.अर्ज क्र. १२५/२०२५ मधील उपविभागीय पोलीस अधिकारी यांचे दि. २४/१२/२०२५ रोजीचे पत्र क्र. २५२४/२०२५ वरील आदेश</u>**

उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग सिल्लोड यांनी त्यांचे कार्यालयाचा इ–फायलींग आय.डी. नसल्यामुळे मा. सहाय्यक सरकारी अभियोक्ता, सिल्लोड यांचे आय.डी. वरुन फौजदारी किरकोळ अर्ज क्र. १२५/२०२५ मधील म्हणणे दाखल करुन घेऊन स्विकारणेबाबत सादर केलेला आहे.

०२. सदर पत्रावर सहाय्यक सरकारी अभियोक्ता एस. बी. सपकाळ यांचे म्हणणे मागितले. त्यांचे म्हणणे की, इ–फायलींग पोर्टल मध्ये एकुण चार पर्याय आहेत. पैकी प्रथम पर्याय वकीलांसाठी, द्वितीय पर्याय सरकारी वकीलांसाठी, तृतीय पर्याय पक्षकार किंवा तपास अधिकारी यांचेसाठी आणि चतुर्थ पर्याय कोणत्याही कार्यालयातील कारकुन यांचेसाठी उपलब्ध आहेत. करिता पोलीस यंत्रणा पर्याय क्र. ३ आणि ४ चा वापर करुन स्वतःचे आय.डी. वरुन खाजगी खटल्यामध्ये आपले म्हणणे दाखल करु शकते.

०३. त्यांचे पुढील कथन असे की, एकदा सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचे आय.डी. वरुन म्हणणे अपलोड केल्यास ती केस डिलीट होत नाही. त्यानंतर त्या सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांची बदली झाल्यास त्यांचे जागी बदलुन येणाऱ्या सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचे आय.डी. वर ते प्रकरण वर्ग होत नाही. त्यामुळे अडचण निर्माण होते. याबाबत त्यांनी त्यांचे वरिष्ठांशी चर्चा केल्यानंतर वरिष्ठांनी त्यांना खाजगी खटल्यांमध्ये त्यांचे आय.डी. वरुन पोलीस यंत्रणेचे म्हणणे दाखल करु नये असे सुचविले आहे. करिता योग्य तो आदेश पारीत होण्याची विनंती केली आहे.

०४. सिल्लोड तालुक्यात कार्यरत कोणत्याही पोलीस ठाण्याचा इ–फायलींग पोर्टलवर आय.डी. तयार केलेला आहे असे दिसुन येत नाही. परंतु इ–फायलींग पोर्टलवर प्रत्येक पोलीस स्टेशनचा आय.डी. निर्माण करण्याची सुविधा उपलब्ध आहे. एवढेच नव्हे तर जिल्ह्यामध्ये कार्यरत इतर पोलीस ठाणे यांनी त्यांचे स्वतंत्र आय.डी. निर्माण करुन घेतलेले आहेत. सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी खाजगी खटल्यांमध्ये

त्यांचे आय.डी. वरुन पोलीस यंत्रणेचे म्हणणे दाखल करणे हे त्यांचे काम नसलयाचे त्यांचे वरिष्ठांनी त्यांना कळविलेबाबत सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. सपकाळ यांचे खुलाश्यावरुन दिसुन येते. त्यामुळे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. सपकाळ यांनी या न्यायालयात दाखल प्रत्येक खाजगी खटल्यामध्ये पोलीस यंत्रणेमार्फत दाखल करावयाचे म्हणणे त्यांचे आय.डी. वरुन दाखल करण्यास आदेशीत करता येणार नाही. याऊलट उपविभागीय पोलीस अधिकारी, सिल्लोड यांनी त्यांचे अधिपत्याखालील प्रत्येक पोलीस स्टेशनच्या नावे इ–फायलींग पोर्टलवर आय.डी. निर्माण करण्याचे आदेश प्रत्येक प्रभारी अधिकारी यांना देणे महत्वाचे वाटते. करिता मी प्रस्तुत पत्रावर पुढीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे :–

**आदेश**

i. सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एस. बी. सपकाळ यांनी फौजदारी किरकोळ अर्ज क्र. १२५/२०२५ (गणेश शंकरलाल शंकरपेल्ली वि. महाराष्ट्र शासन) या प्रकरणातील उपविभागीय पोलीस अधिकारी यांचा खुलासा त्यांचे आय.डी. वरुन शेवटची संधी म्हणुन दाखल करावा.

ii. मा. उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग सिल्लोड यांनी त्यांचे अधिपत्याखालील प्रत्येक पोलीस ठाण्याचे प्रमुख अधिकारी यांना आदेशीत करुन प्रत्येक पोलीस ठाण्याचा स्वतंत्र इ–फायलींग आय.डी. निर्माण करुन घेण्याचे आदेश देऊन योग्य ती कारवाई करावी.

iii. प्रस्तुत आदेशाची एक प्रत सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एस. बी. सपकाळ आणि एक पत्र उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग सिल्लोड यांना देण्यात यावी.

Digitally signed by KAILAS TRYAMBAK ADHAYKE
Date: 2026.01.21 11:27:23 +0530

(कैलास त्र्यं. अढायके)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकरी,
(न्यायालय क्र. ०१), सिल्लोड.

दि. २१/०१/२०२६.